
# दुधाची कहाणी गाईची वाणी



उत्पादकाने केलेले
स्वच्छ दूध उत्पादन

गुणवत्ता व संयंत्र व्यवस्थापन

राष्ट्रीय डेरी विकास बोर्ड
आणंद

# प्रस्तावना

आज दूध उत्पादनामध्ये आपला देश जगात पहिल्या क्रमांकावर आहे. तेव्हा केवळ घरात गायी–म्हशी ठेवून, त्यांचे दूध सहकारी संस्थेला देवून आपली जबाबदारी संपते असे नाही. आजच्या परिस्थितीत गरज आहे स्वच्छ दुधाची–असे दूध जे जंतूविरहित असेल आणि लवकर नासणार नाही. अशा दुधापासून बनवलेल्या पदार्थांचा आपल्याला व आपल्या डेरीला देखील फायदा होईल. स्वच्छ दुधाच्या निर्मितीसाठी आपल्याला बऱ्याच गोष्टींची दक्षता घ्यावी लागेल.

उदाहरणार्थ

(१) दुभतें जनावर स्वच्छ व निरोगी ठेवणे.

(२) गुरांचा गोठा स्वच्छ व नीटनेटका ठेवणे.

(३) जनावरांना स्वच्छ पाणी पिण्यास देणे.

(४) दूध काढण्यासाठी व साठवण्यासाठी स्टेनलेस स्टीलच्या स्वच्छ भांड्यांचाच उपयोग करणे.

(५) दूध काढण्यापूर्वी आपले हात साबणाने स्वच्छ धुणे.

(६) गायीची कास स्वच्छ पाण्याने धुणे; नंतर स्वच्छ धुतलेल्या कपड्याने ती कोरडी करणे.

(७) दूध काढण्या अगोदर प्रत्येक सडातून एकदोन धारा काढून त्या फेकून देणे.

(८) दूध काढणारी व्यक्ती स्वच्छ व निरोगी हवी. दूध काढताना त्या व्यक्तीने पान, तंबाखू, गुटखा खाऊ नये. विडी ओढू नये, इत्यादि नियम कटाक्षाने पाळणे.

(९) दुभत्या जनावरांना हिरवा चारा खाऊ घालणे.

(१०) दूध काढून झाल्यावर कास साफ पाण्याने धुणे. नंतर सडांना जंतुनाशक द्रावणात बुडवणे. यामुळे कासेचे आजार होणार नाहीत.

(११) दूधाच्या भांड्यावर घट्ट झाकण ठेवून ते लवकरात लवकर दूध संस्थेत नेऊन घालणे.

(१२) संस्थेत शक्य असेल त्याप्रकारे दूध थंडगार ठेवावे. यामुळे दूध खराब होणार नाही.

जर ह्या सगळ्या गोष्टी आपण काटेकोरपणे पाळल्या तर आपल्याला व आपल्या संस्थेला नक्कीच खूप फायदा मिळेल.

या, चला आपण सर्व स्वच्छ दूध उत्पादन करण्याच्या कामांत एकजूट होवू या.

महाव्यवस्थापक
गुणवत्ता व संयंत्र व्यवस्थापन
राष्ट्रीय डेरी विकास बोर्ड
आणंद – ३८८००१, गुजरात
भारत


# दुधाची कहाणी गाईची वाणी

राजनगर गावांत बनवारी नावाचा शेतकरी रहात होता. त्याला राधा नावाची प्रेमळ बायको व दोन लहान मुले होती. बनवारीचे कुटुंब आनंदी व सुखी होते. त्याच्याकडे भरपूर दूध देणारी गंगा नावाची गाय व तशीच जमुना नावाची म्हैस होती. बनवारी अनेक वर्षे गावामधल्या दूध उत्पादकांच्या संस्थेचा सभासद होता. तो गंगा व जमुना यांचे दूध गावातील संस्थेत घालीत होता. संस्थेत दूध घातल्यामुळे बनवारीला चांगली मिळकत होत होती. घरात कसलीही कमतरता भासत नव्हती. त्याचे खाणे राहाणे चांगले होते. मुले गावांतल्या शाळेत शिकत होती. तो सगळे सणवार आनंदाने व उत्साहाने साजरे करत असे. बनवारी स्वत:ला नशिबवान समजत होता की त्याच्याकडे गंगासारखी गाय आणि जमुनासारखी म्हैस आहे.  राधा आणि मुलंसुद्धा गंगा आणि जमुनावर खूप प्रेम करायचे.



बनवारीचे आनंदी कुटूंब

परंतु अचानक या सुखी कुटुंबावर दुःखाचे सावट पसरले. गंगा गाईला काहीतरी रोग झाला. ती आजारी पडू लागली. बनवारीने सुरवातीला काही घरगुती उपाय केले. त्याचा काहीही उपयोग झाला नाही. गंगा गाय हलक्या प्रतीचे व कमी दूध देऊ लागली. बनवारीची मिळकत कमी झाली. त्याला अनेक अडचणी येऊ लागल्या. गंगा गायीला विकावे असा विचार त्याच्या मनात आला. राधाने त्याला खूप विरोध केला पण पैशाच्या तंगीमुळे फारच अडचणी येऊ लागल्याने बनवारीने गंगाला विकण्याचा निर्णय पक्का केला.



गंगा आजारी, कुटुंब काळजीत, मिळकत कमी


त्याच सुमारास जवळच्या गावांत जनावरांचा बाजार भरलेला होता. बनवारीने ठरविले की त्या बाजारांत जाऊन गंगाला विकावे आणि त्या पैशांतून नवीन गाय आणावी.



*बनवारी गंगा गाईला विकण्यासाठी जनावरांच्या बाजारांत घेऊन जात आहे*

दुसऱ्या दिवशी सकाळी बनवारी गंगाला घेऊन जाण्यासाठी तयार झाला. राधा व मुले गंगाला मिठी मारून रडू लागली. बनवारीचे डोळेही पाणावले. पण त्याने आपले मन घट्ट केले. बायको आणि मुलांची समजूत काढली. गंगाला घेऊन तो बाजाराला निघाला.

अर्ध्या वाटेवर पोहोचल्यावर बनवारी काही वेळ विसावा घेण्यासाठी एका झाडाखाली थांबला. गंगाच्या डोळ्यांतील आसवे पाहून तो मनोमनी उदास झाला व गहिवरुन तिला म्हणाला– ''मला क्षमा कर गंगा.'' अशाच विचारांत गढलेला असताना त्याला एक हाक ऐकू आली त्याने मागे वळून पाहिले. गंगा त्याला म्हणत होती ''दादा मला आपल्या कुटुंबापासून तोडू नकोस. मला विकू नकोस रे दादा.''



*रस्त्यात गंगा बनवारी बरोबर बोलू लागली*

बनवारीचा विश्वासच बसेना. त्याला वाटले आपण स्वप्नच पहात आहोत; त्या विचाराने त्याने गंगाशी बोलायला सुरवात केली ''काय करू गंगा? माझा नाईलाज झाला आहे. तुझे दूध कमी झाले आहे आणि जे देतेस ते खराब आहे; त्यामुळे माझी मिळकत बरीच कमी झाली आहे. तुला विकून नवीन गाय घेतली तरच माझी मिळकत वाढेल. तुला विकताना मला खूप वाईट वाटतेय गऽ पण तुझं दूध कमी व खराब होण्यास कोणता आजार कारणीभूत आहे तेच कळत नाही.''

गंगा म्हणाली– ''पण यांत माझा काय दोष?''

दीर्घ श्वास घेत बनवारी म्हणाला– ''होय गंगा, कदाचित देवाचीच तशी इच्छा असेल.''

गंगा म्हणाली– ''क्षमा कर दादा, पण यांत देवाचा काहीही संबंध नाही. खरं तर यांत सगळी चूक तुझी व राधा वहिनीची आहे. तुम्हाला दुभत्या जनावरांची काळजीच घेता येत नाही.''


बनवारी वैतागून म्हणाला– ''गंगा हे तू काय बोलते आहेस? आमच्या कित्येक पिढ्या पशुपालन करीत आल्या आहेत.''ह्यावर गंगा म्हणाली– ''थांब, माझे म्हणणे तुला व्यवस्थित कळावे म्हणून मी तुला दुधाची कहाणीच सांगते.''

बनवारी गोंधळून म्हणाला– ''दुधाची कहाणी?''

''होय, स्वच्छ व ताजे दूध काढणे, त्याची गुणवत्ता टिकवणे व त्यासाठी गुरांची देखभाल करणे, या सर्व गोष्टी म्हणजेच दुधाची कहाणी होय.''

बनवारीने विचारले– ''ही कहाणी तुला कोणी सांगितली?''

गंगा म्हणाली– ''एके दिवशी मी व जमुना हिरवा चारा खाण्यासाठी शेतांत चरायला गेलो होतो. तिथं आम्हाला गौरी व पारो या नावांच्या दोन गाई व चंपा नावाची एक म्हैस भेटली. त्यांच्याशी गप्पा मारताना कळले की त्यांना कोणालाच मोठा आजार झालेला नव्हता व त्यांचे दूधपण खराब होत नव्हते.''



गौरी, चंपा व पारो गंगा–जमुनांना दुधाची कहाणी सांगत आहेत

''असं होय?''

''होय, त्यांच्या मालकाने डेरी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतले आहे. गौरी, पारो व चंपाला ते दोघे कसे सांभाळतात व दूध कसे स्वच्छ ठेवतात याबद्दल त्यांनी माहिती दिली, मी त्याचीच कहाणी तुला सांगणार आहे.''

बनवारी म्हणाला– ''बरं सांग''

पारो : मैत्रिणींनो तुम्हाला होत असलेला त्रास ऐकून वाईट वाटते. तुमच्या मालकाने तुमची व दुधाची कशी काळजी घेतली पाहिजे, हे आम्हा तिघींकडून ऐका.

चंपा : आम्ही सांगतो ते काळजीपूर्वक ऐका व मालकाला सांगा. आम्ही सांगितलेल्या गोष्टी त्याने काटेकोरपणे पाळल्या तर तुम्ही आजारी पडणार नाहीत.

गौरी : तुम्ही देखील कसदार दूध देऊ लागाल. आणि तुमच्या मालकाची मिळकत आधीच्या पेक्षा वाढेल.

गंगा : सांगा ग सख्यांनो आम्हाला तर हेच हवे आहे.

गौरी : पहिल्यांदा स्वच्छ दुधासंबंधी ऐका. गायी व म्हशी निरोगी असतील तरच त्यांच्या कासेतून येणारे दूध दोष रहित, स्वच्छ असू शकेल.

चंपा : दुधाची गुणवत्ता टिकवण्यासाठी आपली, आपल्या गोठ्यांची, दूध साठवण्याच्या भांड्यांची आणि धारा काढणाऱ्या व्यक्तीनी सुद्धा कटाक्षाने स्वच्छता ठेवायला पाहिजे. दुधाच्या धारा काढल्यानंतर लवकरांत लवकर दूध संस्थेत नेऊन घालावे. या गोष्टींची काळजी घेतली नाही तर दुधात सूक्ष्म जीवजंतूंची संख्या वाढते आणि दूध खराब होते.

जमुना : सूक्ष्म जीव? मी तर दुधात सूक्ष्म जीव कधीच पाहिले नाहीत.

इतर सर्वजणी : होय, आम्ही पण पाहिले नाहीत.

पारो : सूक्ष्म जीव इतके लहान असतात की नुसत्या डोळ्यांना ते दिसत नाहीत. त्यांना जीवाणू असेही म्हणतात. ते फक्त सूक्ष्मदर्शक यंत्राखालीच दिसू शकतात. तेच जीवाणू दुधाची गुणवत्ता कमी करतात.

गंगा : म्हणजे, तुम्ही आता सांगितलेल्या सर्व गोष्टी मालकाने पाळल्या तर दूध चांगले राहील ?



जीवाणू पहाण्याचे सूक्ष्मदर्शक यंत्र

पारो : अगदी बरोबर! गायी–म्हशींची स्वच्छता व त्यांचे निरोगी असणं ह्या बरोबर दूध काढणाऱ्या व्यक्तिची, दूध काढायला वापरलेल्या भांड्याची आणि जिथे दूध काढले जाते त्या जागेची स्वच्छता ह्या तिन्ही बाबींची सुद्धा जीवाणूंच्या संख्येचे नियंत्रण करायला मदत होते. अशा दुधावर धूळ बसत नाही की माशाही येत नाहीत.

चंपा : असे दूध स्टेनलेस स्टीलचे झाकण असलेल्या भांड्यात संस्थेत लवकर पोहोचवले तर दुधाची गुणवत्ता जास्त काळ टिकून राहते.

पारो : तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल, पण ह्या गोष्टींचे पालन न करतां दूध संस्थेत दिले तर त्या दुधामध्ये हजारों नव्हे तर लाखो जीवाणू तयार होतात.

जमुना : अरे बापरे !

गौरी : हो, हे जीवाणू दर १५ ते २० मिनिटांत दुप्पट होतात. त्यामुळे दुधाची गुणवत्ता भराभर कमी होते.


जमुना : पण स्वच्छ दुधाने आमच्या मालकाला काय फायदा होतो?

गौरी : दूध स्वच्छ व ताजे असेल तर ते दूध पिणारे लोकही निरोगी रहातील. शिवाय त्या संस्थेच्या डेरी वरील विश्वास वाढून ते त्यांच्याकडूनच कायम दूध घेत राहतील.

चंपा : अशा दुधापासून तयार होणारे पदार्थ जास्त पौष्टिक व स्वादिष्ट होतात. ते पदार्थ लवकर खराब होत नाहीत. त्यामुळे दूध उत्पादक व दूध संस्था या दोघांची मिळकत वाढते.

गंगा : ताई, आम्हाला दूध स्वच्छ ठेवण्याचे उपाय सांग ना.

पारो : त्यासाठी गाय, म्हैस या कशा निरोगी राहतील हे आधी पाहिले पाहिजे. त्यांना ज्या ठिकाणी ठेवतात ती जागा स्वच्छ असावयास हवी. बरं तुम्हाला कुठं ठेवतात गं?



*स्वच्छ व निरोगी जनावर*

जमुना : आम्हाला तर घराच्या समोरच्या झाडाला बांधतात. आम्ही जिथे बसतो ती जागा घाण होते कारण तेथे मूत्र व शेण पडते व तेथेच जमा होते. तेथील केरकचरा व घाण कोणीही चांगल्याप्रकारे साफ करीत नाही. आमच्याच घाणींत आम्ही उठबैस करतो.


चंपा : जेथे गुरांना ठेवतात त्या जागेवर छप्पर हवे. जागा हवेशीर व आरामदायक हवी. त्याचप्रमाणे पिण्यालायक पाण्याची योग्य सोयही हवी.

गौरी : गुरांचा गोठा व आजूबाजूची जागाही स्वच्छ असावी. दूध काढतो त्याठिकाणी चारा ठेवतां कामा नये. गाई म्हशी ठेवतात त्या गोठ्यांतील जमीन नीटनेटकी व सिमेंटनी मजबूत अशी केलेली असावी. पक्की फरशी असल्यास उत्तमच.


गंगा : आणखी काय करावयास हवे?

गौरी : जिथे गुरांना बांधतात ती जागा अशी हवी की पाणी व मूत्र जनावरांच्या मागील बाजूने लहान गटारांतून वाहात जाऊन ते शोषले जाण्यासाठी केलेल्या बाजूच्या खड्ड्यांत जमा होईल.

पारो : शेण हे गुरांपासून दूर नेऊन खताच्या खड्ड्यांत अगर गोबर गॅसच्या टाकीत नेऊन टाकले पाहिजे.




*गाय व म्हैस यांना स्वच्छ जागेत ठेवले पाहिजे. खाली पक्की फरशी घातलेली हवेशीर व आरामदायक असा गोठा असावा*



*शेण गुरांपासून दूर असलेल्या शेणासाठींच्या खड्ड्यांत अगर गोबर गॅसचे टाकीत टाकले पाहिजे*

एवढी माहिती सांगितल्यावर गंगा एकदम गप्प झाली. बनवारी तिचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होता. पुढे काय झाले ते ऐकण्यास तो उत्सुक होता. तो गंगाला म्हणाला– ''मला संपूर्ण कहाणी ऐकव. गौरी, पारो आणि चंपाने तुला आणखी काय काय सांगितले?''

गंगा म्हणाली, ''त्यांनी मला आणखी बऱ्याचशा गोष्टी सांगितल्या. परंतु आपण येथेच बसून बोलू लागलो तर संध्याकाळ होईल. घरी राधा वहिनी व मुलें काळजी करत असतील. चला आपण घरी जाऊया. उरलेली गोष्ट मी तुला रस्त्याने जाता जाता सांगते.''


बनवारी गंगा गाईला घेऊन घरी परतत आहे

बनवारीलाही ते पटले. त्याने गंगाला बांधलेला दोर सोडला. तिला घेऊन तो घरी येऊ लागला. थोडे चालून गेल्यावर त्याच्या लक्षांत आले व तो एकदम थांबून म्हणाला, ''आपण तर गुरांच्या बाजाराला चाललो होतो ना?''


आपण परत घरी जात आहोत याचा गंगाला अतिशय आनंद झाला होता. पण बनवारीचा प्रश्न ऐकून ती फार उदास झाली आणि म्हणाली, ''दादा, ही गोष्ट मी तुला सांगत होते कारण की तू जर योग्यप्रकारे माझी काळजी घेतलीस तर मी आजारी पडणार नाही. त्यामुळे मी सध्यापेक्षा जास्त तसेच कसदार व स्वच्छ दूध देईन व तुझी कमाई वाढेल. तरीही तू मला गुरांच्या बाजारात विकणार का?''

बनवारीने थोडावेळ विचार केला आणि तो म्हणाला, ''बरं एकवेळ तू सांगितल्याप्रमाणे तुझी काळजी घेतो. तू जर आजारातून बरी झालीस तर कामयमची आमच्याजवळ रहाशील. बरं तर आता पुढील गोष्ट सांग.''

गंगाला पुन्हा फार आनंद झाला आणि ती पुढील गोष्ट सांगू लागली. तिने चंपा व गौरीने दूध काढणाऱ्या व्यक्तीबाबत दिलेली माहिती सांगावयास सुरवात केली.

पारो : दुधाची धार काढणारी व्यक्ती जर आजारी असेल तर तिच्या आजाराचा परिणामही दुधावर होतो.

चंपा : म्हणूनच कोणाला सर्दी, पडसे, खोकला, क्षयरोग, त्वचेचा आजार अगर इतर सांसर्गिक रोग झाला असेल तर त्या व्यक्तीने दूध काढावयास बसू नये.


दुधाच्या धारा काढणारी व्यक्ती स्वच्छ हवी

पारो : कोणाला जखम, खरूज, फोड इत्यादिपैकी काही झाले असेल, अगर कापले असेल तर त्यांनी सुद्धा योग्यप्रकारे मलमपट्टी केल्याशिवाय दूध काढू नये.

चंपा : दूध काढणारी व्यक्ती स्वच्छ हवी. त्याचे कपडे धुतलेले हवेत. दूध काढतांना दूध काढणाऱ्या व्यक्तीने किंवा आजूबाजूच्या लोकांनी खोकू वा शिंकू नये. त्याचप्रमाणे तेथे पानपट्टी, तंबाखू व गुटखा खाऊ नये. विडी ओढू नये.

हे ऐकून बनवारी म्हणाला, ''खरंच गंगा, आम्ही सगळेजण ह्या चूका करीत असतो. यापुढे दूध काढतांना ह्या सगळ्या गोष्टी नीट लक्षांत ठेवू.''


एवढे संभाषण होईतो बनवारी व गंगा घरी पोहोचले. गंगा परत घरी आलेली पाहून राधा व मुलांना खूप आनंद झाला. राधाने आश्चर्याने विचारले, ''काय हो गंगाला परत घेऊन आलात?'' रात्रीची जेवणे झाल्यावर झोपताना बनवारीने राधाला गंगेने सांगितलेली दुधाची कहाणी ऐकविली. राधाला ती गोष्ट ऐकून आश्चर्य वाटले व फार आनंदही झाला. दुसऱ्या दिवशी जेंव्हा बनवारी व राधा गंगा जवळ गेले तेव्हा राधा म्हणाली, ''गंगा, मला तुझ्या दादांनी दुधाची कहाणी सांगितली बरं का ! तू काळजी करू नकोस. तुझ्या मैत्रिणींनी सांगितल्याप्रमाणे आम्ही तुझी देखरेख करू.''

गंगाच्या डोळ्यांत आनंदाश्रू भरून आले. ती म्हणाली, ''वहिनी, मी आयुष्यभर तुमची सेवा करू इच्छिते. पण आणखी काही गोष्टी तुम्ही लक्षांत ठेवावयास हव्यात. यामुळे मी व जमुना निरोगी राहू. पण जमुनेला आणि मला निरोगी ठेवण्यासाठी आणि तुम्हाला स्वच्छ पौष्टिक व भरपूर दूध देत राहण्यासाठी, तुम्हाला आणखीन काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील.

राधा म्हणाली, ''गंगा, सांग बरं आणखी कोणत्या गोष्टी लक्षांत ठेवाव्यास हव्यात?''


गंगा म्हणाली, ''घरांतली माशी आमची एक नंबरची शत्रू आहे. माशांच्या अंगावर लाखोंनी रोगजंतू असतात. त्यामुळे अनेक आजार होतात आणि दूधही नासते.''

राधा म्हणाली, ''बरं, त्याचा अर्थ असा की, दूध चांगले राहाण्यासाठी त्यापासून माश्यांना दूर ठेवावयास हवे.''



*एका माशीच्या शरीरावर सुमारे अकरा लाख रोगजंतू सापडतात*

गंगा : हो, दुधाला माश्या व घाणी या दोघांपासून दूर व जपून ठेवले पाहिजे. तसेच गायी-म्हशींच्या शरीरांवर घाण असेल तर त्यांवर सुद्धा कोट्यावधी रोगजंतू आढळणारच.



दूध काढण्यापूर्वी थंडीच्या दिवसांत गुरांना मऊसर ब्रशाने घासून साफ करावे. उन्हाळ्यात गुरांना पाण्याने स्वच्छ धुवावे

यासाठी दुधाची धार काढण्यापूर्वी जनावरांना स्वच्छ करावे. उन्हाळ्यात पाण्याने धुवावे तर थंडी असताना मऊसर ब्रशाने घासून त्यांचे शरीर साफ करावे. यामुळे त्यांच्या शरीरावरील जंतू दूर होतील.


राधा : बरं बाई, या गोष्टी मी चांगल्याच आठवणीत ठेवीन.

गंगा : दूध चांगले राहाण्यासाठी भांडीदेखील स्वच्छ असावीत. दुधाच्या भांड्यांना साबणाने स्वच्छ धुवावे. त्यांवर माती, घाण अजिबात राहता कामा नये. भांडी धुतली की ती स्वच्छ जागेवर उपडी घालून वाळवावीत.

राधा : ठीक आहे.

गंगा : गायी-म्हशींची कास स्वच्छ पाण्याने धुवावी. नंतर धुतलेल्या स्वच्छ कापडाने ती कोरडी करावी.

राधा : मी तर हे सर्व करतेच !




गायी व म्हशींची कास स्वच्छ पाण्याने धुवावी नंतर धुतलेल्या स्वच्छ कापडाने कोरडी करावी

गंगा : तूं तर तुझ्या साडीच्या पदराने आमची कास पुसतेस. पदरावर कधी कधी घाण असू शकते. या कामासाठी स्वच्छ कापड वापरणे आवश्यक आहे. धार काढण्यापूर्वी प्रत्येक सडातून एक-दोन धारा काढून त्या फेकून द्याव्यात. यामुळे कासेमधे जमा झालेले रोगजंतू निघून जातात. गुराच्या कासेला कधीही तेल लावू नये. दूधाची धार काढण्यापूर्वी हात साबणाने धुतले पाहिजेत.



धार काढण्यापूर्वी प्रत्येक सडातून एक-दोन धारा काढून फेकून द्याव्या




दूधाची धार काढण्यापूर्वी हात साबणाने धुवावे

धार काढणाऱ्या व्यक्तीने आपली बोटे दुधात कधीही बुडवू नयेत.



हाताची बोटे दुधात बुडवू नयेत

दूध काढताना आपल्या शरीराचा कोणताही भाग अगर कपडे दुधाला किंवा दुधाच्या भांड्याला लागू देऊ नये.

बनवारी : बरं पुढे?

गंगा : ही गोष्ट लक्षांत ठेवा की सडांमध्ये थोडेसुद्धा दूध राहता कामा नये, कारण त्यामुळे कासेत रोगजंतूंची वाढ फार वेगाने होते. आणि गुरांना रोग होण्याचा धोका वाढतो.


दुधाची धार काढून झाल्यावर कासांना स्वच्छ पाण्याने धुवावे आणि रोगजंतूनाशक (आयडोफोर) द्रावणात बुडवावे किंवा त्यांच्यावर रोगजंतूनाशक द्रावण शिंपडावे.




दुधाची धार काढून झाल्यावर कासांना स्वच्छ पाण्याने धुवावे आणि रोगजंतूनाशक द्रावणात बुडवावे किंवा त्यांच्यावर रोगजंतूनाशक द्रावण शिंपडावे


बनवारी : बरं, या गोष्टीसुद्धा लक्षांत ठेवू.

गंगा : सोसायटीत दूध नेताना ते झाकण असलेल्या, स्टेनलेसस्टीलच्या भांड्यातूनच न्यावे. भांड्याचे झाकण घट्ट बसणारे हवे नाहीतर त्यामध्ये माशा किंवा धूळ पडेल. दूध काढल्यावर ते लवकरांत लवकर संस्थेत पोचवले म्हणजे ते खराब होणार नाही.



*दुधाची भांडी धुवून ती उपडी घालून वाळवावी*


दुधाची कहाणी ऐकल्यानंतर बनवारी व राधा गोष्टीत सांगितल्याप्रमाणे वागू लागले. सर्व प्रथम त्यांनी गंगाला डेअरीच्या गुरांच्या डॉक्टरकडून तपासून घेऊन, औषधपाणी सुरू केले. योग्य उपचारामुळे गंगा आजारातून बरी झाली. राधा गंगाने सांगितलेल्या सर्व गोष्टी योग्यप्रकारे काटेकोररीत्या पाळू लागली. गंगा व जमुना यांच्या गोठ्याची जागा व आजूबाजूचा परिसर राधा व मुलांनी एकदम स्वच्छ व नीटनेटका केला.



*गंगा गाईवर औषधांचा चांगला परिणाम झाला. बनवारीच्या घरांत आनंद, सुख व समाधान परत आले*


यामुळे गंगापासून कसदार व भरपूर दूध मिळू लागले. जमुनेच्या दुधातही वाढ होऊन दुधाची गुणवत्ता सुधारली. बनवारीच्या कुटुंबाची मिळकत वाढली व तो पूर्वीप्रमाणे आनंदी व सुखी झाला. आता बनवारी आणि राधा आणखी दुभती जनावरे विकत घेण्याचा विचार करू लागली.

स्वच्छ व निरोगी जनावर




(१)

गुरे ठेवण्याची साफ स्वच्छ जागा




(२)

स्वच्छ पाणी



(३)

नीटनेटकी स्वच्छ भांडी




(४)

दूध काढण्यापूर्वी हात साबणाने धुवावेत




(५)

कास व सडे स्वच्छ पाण्याने धुवावी. नंतर धुतलेल्या स्वच्छ कापडाने कोरडी करावी




(६)

दूध काढण्यापूर्वी, प्रत्येक सडातून एक दोन धारा काढून त्या फेकून द्याव्यात




(७)

दूध काढणारी स्वच्छ व निरोगी व्यक्ती




(८)

दुभत्या जनावरांना हिरवा चारा खायला द्या



(९)

दूध काढून झाल्यावर कासांना स्वच्छ पाण्याने धुवावे आणि रोगजंतूनाशक द्रावणात बुडवावे किंवा त्यांच्यावर रोगजंतूनाशक द्रावण शिंपडावे



रोगजंतूनाशक स्प्रे आणि द्रावण


(१०)

संस्थेपर्यंत दूध पोहोचवितांना ते घट्ट झाकणाच्या स्टेनलेस स्टीलच्या भांड्यात लवकर पोहोचवावे




(११)

दूध झटपट गार करण्याचे मशीन



(१२)

© The Copy Right reserved with the National Dairy Development Board, Anand 388 001, India.



**संगीत ऐकल्याने गाय**
**अधिक दूध देते हे आपण ऐकले आहे का?**

पुराणांत संगीताला परमेश्वर मानले आहे.
मोठ्यांत मोठा आजार संगीतामुळे बरा करता येतो
यावर आयुर्वेदांत भर दिला आहे.
पशूसुद्धा संगीताचा आनंद घेतात
हे शोध व अनुभवावरून समजून आले आहे.
संगीत ऐकविल्याने गायी-म्हशी सुद्धा
सुखाचा अनुभव घेतात.
दूध काढतांना मंद मधुर संगीत लावा
व त्याचा अनुभव स्वतःच घ्या.

'Marathi' version of the original 'Hindi' book "Doodh Ki Kahani, Gai Ki Zabani"
published by NDDB, Anand.